# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

## डिसेंबर, २०१७

**(महाराष्ट्र राज्य)**

**समर्थन**
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ,
विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
दूरध्वनी क्र.: ०२२-२२००३०६०
**विश्लेषक : रुपेश किर : ९८९२९३९६१७**
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# हिवाळी अधिवेशन - डिसेंबर, २०१७

## खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१७-१८

**ठळक वैशिष्टे:**

- डिसेंबर, २०१७ च्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत. एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेत हे प्रमाण ८.७८% आहे.
- रु. २६ हजार ४०२ कोटींच्या पुरवणी मागण्यांपैकी प्रत्यक्षात निव्वळ आर्थिक भार हा रु. २१ हजार ९९४ कोटी इतका आहे. म्हणजे ही रक्कम सरकारला कर्ज काढून उभी करावी लागणार आहे. किंवा इतर विभागांचा निधी या पुरवणी मागण्यांसाठी वळवावा लागणार आहे.
- जुलै, २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात एकूण रु.३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या. मुळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण ११.१६% होते.
- मार्च, २०१७चा मुळ अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटी रुपयांचा असून जुलै-डिसेंबर पुरवणी मागण्या रु. ५९ हजार ९३६ कोटी १७ लाखांच्या आहेत. मुळ मागणीत या पुरवणी मागणीचे प्रमाण आता १९.९५% झाले आहे.
- मार्च २०१७ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटींचा होता. जुलै व आताच्या डिसेंबर २०१७ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून एकूण अर्थसंकल्प रु.३ लाख ६० हजार ३३३ कोटी १७ लाखांचा झाला.

- सुरू असलेल्या डिसेंबर अधिवेशनात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत १३ हजार कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत १ हजार कोटी रुपये व आदिवासी विकास विभागांतर्गत १ हजार कोटी रुपये अशी एकूण १५ हजार कोटी रुपयांची रक्कम 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७' म्हणजे शेतकरी कर्जमाफीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकूण पुरवणी मागणीमध्ये ही रक्कम ५६.८१ टक्के.
- जुलै, २०१७च्या पावसाळी अधिवेशनात 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७' म्हणजे शेतकरी कर्जमाफी साठी २० हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले होते. तेव्हाच्या पुरवणी मागण्यांमध्ये ही रक्कम ५९.६४ टक्के होती.
- शेतकरी कर्जमाफीसाठी जुलै-डिसेंबर २०१७ च्या दोन्ही अधिवेशनात मिळून पुरवणी मागणीद्वारे ३५ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत आकस्मिकता निधीतून रु. १४४ कोटी ५४ लाख काढण्यात आले आहेत. तर जुलै अधिवेशनात याच विभागांतर्गत आकस्मिकता निधीतून रु. ४३ कोटी ४८ लाखांची रक्कम काढण्यात आली होती.
- डिसेंबर पुरवणी मागण्यांमध्ये एकूण २७ विभागांच्या ९१ मागण्या असून त्यात २६४ बाबी अंतर्भूत आहेत.
- डिसेंबर, २०१७ मध्ये रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग, २) उद्योग उर्जा व कामगार, ३) जलसंपदा, ४) ग्रामविकास व जलसंधारण व ५) आदिवासी विकास या ५ विभागांनी सर्वात जास्त रु. २१ हजार ३९९ कोटी ९२ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे एकूण पूरक मागणीत प्रमाण ८१.०५% आहे.

# डिसेंबर, २०१७ च्या महसूली व भांडवली पुरवणी मागण्या

तक्ता क्र.१ (रु. कोटीत)

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसूली | ५,३१.०८ | २२,९२७.५४ | २३,५२८.६२ |
| भांडवली | २२.८५ | २,८५०.८५ | २,८७३.७० |
| एकूण | ५,५३.९३ | २५,८४८.३९ | २६,४०२.३२ |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, डिसेंबर, २०१७*

✍ डिसेंबर, २०१७ मध्ये वर्ष २०१७-१८ साठी रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु. २५ हजार ८४८ कोटी ३९ (९७.९०%) लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या रु. ५५३ कोटी ९३ (२.१०%) लाखांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

# मुळ मागणीच्या तुलनेत डिसेंबर पुरवणी मागणीचे प्रमाण ८.७८ टक्के तर एकूण पुरवणी मागणीचे प्रमाण १९.९५ टक्के

तक्ता क्र.२ (रुपये कोटीत)

| मागणी | रक्कम | मुळ मागणीशी प्रमाण | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|
| मार्च, २०१७ मुळ मागणी | ३,००,३९७.६६ | १००.००% | ८९.९६% |
| जुलै, २०१७ पूरक मागणी | ३३,५३३.८५ | ११.१६% | १०.०४% |
| डिसेंबर, २०१७ पूरक मागणी | २६,४०२.३२ | ८,७८% | ७.३२% |
| एकूण मागणी | ३,६०,३३३.८३ | ११९.९५% | १००.००% |

*स्त्रोत: वित्त विषयक विवरण पत्र २०१७-१८ व खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै-डिसेंबर २०१७*

✍ राज्याचा एकूण अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटी एवढा होता. जुलै, २०१७ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. ३ लाख ३३ हजार ९३१ कोटी ५१ लाख झाला होता त्यात डिसेंबर २०१७ च्या रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पुरवणी मागण्यांची भर पडली असून एकूण अर्थसंकल्प आता ३ लाख ६० हजार ३३३ कोटी ८३ लाखांचा झाला आहे.

# सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

तक्ता क्र. ३ *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणीचे मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| सहकार,पणन व वस्त्रोद्योग | ३ | १४,२४०.७७ | १,४१८.४३ | १००३.९८% |
| उद्योग, उर्जा व कामगार | ४ | ३,४९३.८५ | ११,३५५.३१ | ३०.७६% |
| जलसंपदा | ३ | १,३१८.३३ | ११,९२१.३१ | ११.०५% |
| ग्रामविकास व जलसंधारण | ३ | १,२१७.४४ | १७,६८५.४४ | ६.८८% |
| आदिवासी विकास | ५ | १,१२९.५३ | ८,८१७.२८ | १२.८१% |
| ४ | ८ | २१,३९९.९२ | ५१,१९७.७७ | ४१.७९% |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, डिसेंबर, २०१७ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग - २*

- डिसेंबर, २०१७ खर्चाचे पूरक विवरणपत्र मध्ये रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पूरक मागण्या सादर करण्यात आले. या विवरणपत्रात २७ विभागांचा समावेश होता. त्यापैकी १) सहकार,पणन व वस्त्रोद्योग,२) उद्योग, उर्जा व कामगार, ३) जलसंपदा विभाग, ४) ग्रामविकास व जलसंधारण तसेच ५) आदिवासी विकास विभाग यांनी प्रत्येकी १ हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या केल्या असून एकूण पुरवणी मागणीमध्ये या ५ विभागांचे प्रमाण ८१.०५% आहे.

- सहकार, पणन व वस्त्रोद्योग या विभागाने सर्वाधिक रु.१४ हजार २४० कोटी ७७ लाखांची पुरवणी मागणी केली असून एकूण पुरवणी मागणीत त्याचे प्रमाण ५३.९३% टक्के आहे.

- सहकार, पणन व वस्त्रोद्योग, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी विकास विभागांतर्गत १५ हजार कोटी रुपये 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७' साठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मागील पावसाळी (जुलै-ऑगस्ट-२०१७) अधिवेशनात सदर योजनेसाठी म्हणजे शेतकरी कर्जमाफीसाठी २० हजार कोटी रुपये देण्यात आले होते. कर्जमाफीची आतापर्यंतची रक्कम ३५ हजार कोटी रुपये झाली.

✍ शेतकरी कर्जमाफीसाठी, म्हणजे 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७' साठी आदिवासी विकास विभागाकडून पावसाळी अधिवेशनात (जुलै-ऑगस्ट-२०१७) १ हजार कोटी व हिवाळी (डिसेंबर-२०१७) अधिवेशनात १ हजार कोटी असे एकूण २ हजार कोटी रुपये काढण्यात आले आहे.

## आकस्मिकता निधीतून काढलेली रक्कम १४४ कोटी ५४ लाख

### त्यापैकी सहकार विभागाचा वाटा १००%

तक्ता. क्र. ४ *(रु. कोटीत)*

| विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| **सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग** | २२१ | सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य | १०८.६४ |
| | २२६ | 'भीमा सहकारी साखर कारखाना', दौंड, पुणे यांना खेळते भांडवलासाठी कर्ज सहाय्य. | ३५.९० |
| | | **एकूण** | **१४४.५४** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, डिसेंबर, २०१७*

✍ वर्ष २०१७-१८च्या डिसेंबर अधिवेशनात एकूण रु. २६ हजार ४०२ कोटी ३२ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत त्यापैकी आकस्मिकता निधीतून सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाअंतर्गत रु.१४४ कोटी ५४ लाख काढण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये याचे प्रमाण ०.५४ टक्के आहे.

✍ आकस्मिकता निधीतून काढण्यात आलेली ही रक्कम सहकार विभागांतर्गत सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी व 'भीमा सहकारी साखर कारखान्या'ला खेळते भांडवल देण्यासाठी काढण्यात आली आहे. आकस्मिकता निधीच्या वापराबाबतचे नियम स्पष्ट केलेले असूनही, या येथे आकस्मिकता निधीचा पुन्हा एकदा गैरवापर केलेला दिसून येतो.

## आकस्मिकता निधीसंबंधी अंदाजसमितीची शिफारस

अकल्पित व तातडीचा खर्च भागविण्यासाठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या आगाऊ रकमेची भरपाई करावयाची यास पुरवणी मागणी करता येते.

''अतिरिक्त खर्च समायोजित करण्यासाठी शासनाकडून आकस्मिकता निधीची मुळ मर्यादा तात्पुरत्या स्वरुपात बऱ्याचदा वाढविण्यात येते. पुष्कळदा असा खर्च सत्ताधारी पक्षाच्या राजकीय गरजा व अत्यावश्यक गोष्टी भागविण्यासाठी केला जातो. त्यामुळे विधानमंडळाचे प्राधिकार धोक्यात येतात...'' गोडबोले समितीच्या या मताशी सहमती दर्शवित अंदाज समितीने पुढील शिफारस केली. ''आकस्मिकता निधीतून रक्कम काढण्यासंबंधी एक नियमावली तयार करण्यात यावी व त्यात कोणत्या परिस्थितीमध्ये व कोणत्या प्रकाराअंतर्गत किती रक्कम काढण्यात येईल याबाबत विशिष्ट असे निकष घालून द्यावेत जेणे करुन या फंडाचा गैरवापर टाळता येईल.'' परंतु अजूनपर्यंत अशाप्रकारची नियमावली राज्य शासनाने तयार केलेली नाही.

*स्त्रोत: अंदाज समितीचा अहवाल, २००१*

## ५ हजार १९२ कोटी ३६ लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होणार!

### दोन दिवसात रु. २१ हजार २०९ कोटी ९६ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा!

तक्ता. क्र. ५ *(रु. कोटीत)*

| चर्चा होणारे विभाग | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणीचे मुळ मागणीशी % |
|---|---|---|---|---|
| **१८ डिसेंबर,२०१७** | | | | |
| महसूल व वन | ६ | ५२०.४३ | १२,३४५.०९ | ४.२१% |
| कृषि व पदुम | ४ | ४६९.८९ | ८,००४.६२ | ५.८७% |
| नगर विकास | २ | २३२.४८ | १९,९६७.६१ | १.१६% |
| सार्वजनिक आरोग्य | १ | ८५०.०७ | ८,१९५.१८ | १०.३७% |
| आदिवासी विकास | ५ | १,१२९.५३ | ८,८१७.२८ | १२.८१% |
| **१९ डिसेंबर,२०१७** | | | | |
| सार्वजनिक बांधकाम | ७ | ७८४.९८ | १४,५०२.६१ | ५.४१% |
| जलसंपदा | ३ | १,३१८.३३ | ११,९२१.३१ | ११.०५% |
| ग्रामविकास | ४ | १,२१७.४४ | १७,६८५.४४ | ६.८८% |
| सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ३ | १४,२४०.७७ | १,४१८.४३ | १००३.९८% |
| महिला व बाल विकास | १ | ४,४६.०४ | २,३१८.११ | १९.२४% |
| **एकूण** | **३६** | **२१,२०९.९६** | **१,०५१७५.६८** | **२०.१६%** |
| **विनाचर्चा मंजूर होणाऱ्या मागण्या** | **५५** | **५,१९२.३६** | | |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, डिसेंबर, २०१७ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज - भाग -२*

- महसूल व वन, कृषि व पदुम, नगर विकास, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास या ५ विभागांवर दि.१८ डिसेंबर, २०१७ रोजी चर्चा होईल तर सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, ग्रामविकास व जलसंधारण, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, तसेच महिला व बाल विकास या ५ विभागांवर दि. १९ डिसेंबर, २०१७ रोजी चर्चा होणार आहे.
- सदर १० विभागांच्या रु.२१ हजार २०९ कोटी ९६ (८०.३३%) लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून उर्वरित *१७ विभागांच्या रु. ५ हजार १९२ कोटी ३६ (१९.६७%) लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होतील.*

## फडणवीस सरकारच्या पुरवणी मागण्या पोहोचल्या १ लाख ४० हजार ७६९ कोटींवर

## डिसेंबर, २०१७च्या अधिवेशनात सादर केल्या २६ हजार ४०२ कोटींच्या पुरवणी मागण्या

*आलेख* *(रु. कोटीत)*




*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- डिसेंबर, २०१४ ते डिसेंबर, २०१७*

- युती शासनाने सत्तेवर आल्यापासून म्हणजे डिसेंबर, २०१४ पासून डिसेंबर, २०१७ पर्यंत १० वेळा पुरवणी मागण्या सादर केल्या. या सर्व पुरवणी मागण्यांची एकूण रक्कम रु. १ लाख ४० हजार ७६९ कोटी ८० लाख आहे.
- हेच शासन विरोधी बाकांवर असताना तात्कालीन आघाडी शासनाला वाढत्या पुरवणी मागण्यांबाबत, राज्यावरील वाढत्या कर्जाबाबत, राज्यातील आर्थिक बेशिस्तीबाबत सतत ओरडत होते. मात्र स्वत: सत्तेवर आल्यानंतर विक्रमी पुरवणी मागण्या करीत आहे, हे पाहता राज्याचे आर्थिक नियोजन डळमळले आहे.
- मार्च, २०१५ व मार्च २०१६ वगळता प्रत्येक अधिवेशनात पूरक मागण्यांसाठी ८ हजार ते ३३ हजार कोटी रुपयांची रक्कम काढण्यात आली आहे.
- जुलै, २०१७ मध्ये ३३ हजार ५३३ कोटी रक्कम काढण्यात आली आहे. ही रक्कम युती शासनाने नोव्हेंबर, २०१४ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये सर्वात विक्रमी पुरवणी मागणी ठरली आहे.

## पुरवणी मागण्यांवरील चर्चेसंदर्भात अंदाज समितीचे मत:

''विधानमंडळात पूरक मागण्यांवर फक्त २ दिवस चर्चेला असतात. या २ दिवसात फक्त ८ ते १० विभागांची चर्चा होते. सर्व काम सुरळीत चालल्यास चर्चेसाठी ६ तास उपलब्ध होतात. त्यामध्येच खात्यांच्या मंत्र्यांच्या उत्तराची वेळ समाविष्ट आहे म्हणजे साधारणत: ६ तास एकूण २८९ सदस्यांना उपलब्ध असतात व ही वेळ बऱ्याचदा सदस्यांना अपुरी पडते. त्यामुळे बहुतेकदा चर्चा न करता विधानमंडळांकडून पूरक मागण्या मंजूर केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे''. बहुतांश पुरवणी मागण्या या खर्चाला औपचारिक मंजुरी मिळविण्यासाठी केलेल्या असतात. याचा अर्थ अर्थसंकल्पाला मंजुरी देताना विधिमंडळ ज्या खर्चांना मान्यता देते त्यासाठी रक्कम उपलब्ध न होता राजकीय हितासाठी केलेल्या पुरवणी मागण्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. असे असेल तर नियोजन, अर्थसंकल्प मंजुरी प्रक्रिया या औपचारिकता ठरतात. विधिमंडळाच्या 'अर्थसंकल्प मंजूर करण्याच्या अधिकारा'चा तो संकोच आहे. चर्चेशिवाय संमत होणाऱ्या पुरवणी मागण्या ही एक शासनाच्या अर्थसंकल्पातील गंभीर बाब असून त्यावर विरोधी पक्षाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. याच कारणाने शासनाचा पुरवणी मागण्यांबाबतचा गैरव्यवहार वाढत चालला आहे. म्हणून पुरवणी मागण्यांवर चर्चा होण्याकरिता काहीना काही तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे.

# चर्चेला असलेल्या विभागांसाठी बाबनिहाय मुद्दे

## १८ डिसेंबर, २०१७

## महसूल व वन विभाग

## पूरक मागणी क्र.सी-१

## २०२९, जमीन महसूल

**बाब क्र.९ जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख यावरील खर्च भागविण्याकरीता १ कोटी ४३ लाख रुपयांची तरतूद.**

- सदर तरतूद २०१७-१८च्या अर्थसंकल्पात अपुरी असल्याने १ कोटी ४३ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाने वर्ष २०१५-१६ या कालावधीत ५१ हजार १७० कोटींचा कर महसूल वसूल केला नव्हता हा कर विवादास्पद म्हणून सांगण्यात येत आहेत म्हणजे या बाबतची प्रकरणे न्यायाधीन आहेत, तर २१ हजार ६३० कोटींचा कर वसूल केला नव्हता. मात्र हा कर निर्विवाद होता. म्हणजे राज्य शासनाने हा कर सक्तीने वसूल करणे गरजेचे होते. त्याचप्रमाणे ३ हजार ७४ कोटी रुपयांचा करेतर महसूल हा ३ हजार ७४ कोटी रुपयांचा आहे. अशी एकूण कराची रक्कम ७५ हजार ८७४ कोटी रुपयांची आहे.
- हा कर राज्य शासन वसूल करण्यात अपयशी ठरले असून जर राज्य शासनाने हा कर वसूल करण्यासाठी विशेष प्रयत्न केले असतेत तर राज्य शासनाला विशेष करून वित्त विभागाला दि. ३० जून व ८ ऑगस्ट, २०१७ सारखे परिपत्रक काढून सामाजिक विभागांच्या खर्चावर टाच आणावी लागली नसती. या परिपत्रकात शासनाने स्पष्ट म्हटले आहे की, कोणत्याही विभागाने वित्त संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी परस्पर बोलणी करू नये तसेच त्याबाबत वित्त विभाग व मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. तसेच या परिपत्रकाद्वारे शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, महिला व बाल, आरोग्य विभाग, आदिवासी विकास, कौशल्य विकास या विभागांच्या योजनांच्या खर्चावर बंधने आणली गेली त्याचाच परिणाम म्हणून आज राज्यातील सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या खर्चात कपात करण्यात आली आहे. राज्यातील १,३०४ प्राथमिक शाळा बंद करण्यात येत आहे. सामाजिक संस्था चालवित असलेल्या आधारगृहांचा

निधी बंद करण्यात आला आहे. त्यांना दिला जाणारा भोजन अनुदान बंद करण्यात आला आहे. त्यामुळे बालगृहातील १४ हजार बालकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

- आज राज्यावर ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्तीचे कर्ज आहे. यापेक्षा अधिक कर्ज घेण्याची क्षमता राज्याची आहे असे मुख्यमंत्री सांगत असतात मात्र हे कर्ज फेडण्याची ताकद आज राज्याची उरलेली नाही. त्यामुळे इतर विभागांवरही बंधने आणली जात आहे. जर वित्त विभागाने मागील ३ वर्षात महसूल विभागातील रिक्त पदे भरून कर वसुलीला प्राधान्य दिले असते. तर राज्यावर अशाप्रकारचे आर्थिक संकट उभे राहिले नसते मान. वित्त मंत्र्यांनी कर्ज वसुलीबाबत ज्या घोषणा सुरुवातीच्या काळात केल्या होत्या त्या आज हवेतच विरल्याचे चित्र निदर्शनास येत आहे. त्यामुळे आज राज्य आर्थिक संकटात सापडले आहे. तरी त्याबाबत युद्ध पातळीवर उपाययोजना करण्यात याव्यात.

## सार्वजनिक आरोग्य विभाग

### पूरक मागणी क्र. आर-१

### २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

बाब क्र. १८२ व १८३. मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालयांचा व दवाखान्यांचा खर्च भागविण्याकरिता तरतूद अनुक्रमे रु. १० कोटी व ३ कोटी २५ लाख पुरवणी मागणी द्वारे देण्यात येणार आहेत.

- राज्यात नवसंजीवनी योजनेअंतर्गत १६ जिल्हे येतात या १६ आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी वर्ग २ व ३मध्ये एकूण ९८० पदे मंजूर आहेत त्यापैकी ३४२ पदे रिक्त आहेत, आरोग्य सहाय्यक पुरुष वर्गाची ६६२ पदे मंजूर असून १५२ पदे रिक्त आहेत. तर आरोग्य सहाय्यक स्त्री वर्गाची ४७९ पदे मंजूर असून ७७ पदे रिक्त आहेत. भरारी पथकातील मानसेवी अधिकाऱ्यांची २८१ पदे मंजूर असून ३४ पदे रिक्त आहेत. बहुद्देशीय आरोग्य कर्मचारी पुरुष वर्गाची २१३१ पदे मंजूर असून ६४६ पदे रिक्त आहेत. तर या विभागातील स्त्री वर्गाची २४८१ पदे मंजूर असून १३२ पदे रिक्त आहेत.

- राज्यातील उपरोक्त विभागात असलेल्या रिक्त जागांमुळे राज्याच्या आरोग्य सेवेवर मोठा परिणाम झालेला आहे. वर्ष २०१६-१७ मध्ये १४ हजार ३६५ बालमृत्यू झाले असून एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ या ७ महिन्यांच्या कालावधीत ८ हजार ५३२ बालकांचा मृत्यू झाला आहे. तसेच वर्ष २०१६-१७ मध्ये १७ हजार १९७ अर्भकांचा मृत्यू झाला आहे. तर एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ या ७ महिन्यांच्या कालावधीत ९ हजार ६९८ अर्भकांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य संचालनालयाच्या अहवालातून प्राप्त झाली आहे. राज्यातील आरोग्य सेवेमध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव आणि मोठ्या प्रमाणावर असलेल्या रिक्त जागा यामुळे राज्याची आरोग्याची स्थिती भीषण झालेली आहे. त्याबाबत शासनाने त्वरित उपाययोजना करणे गरजेचे असून वित्त विभागाने आरोग्य विभागाला निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.

## पूरक मागणी क्र. आर-१

## २२११, कुटुंब कल्याण

**बाब क्र. १९२ 'प्रधान मंत्री मातृ वंदना योजना' या केंद्र पुरस्कृत योजनेचा खर्च भागविण्यासाठी ९० कोटी रुपयांची तरतूद.**

- आज देशात प्रत्येक ३ महिलांमागे एक महिला कुपोषित आहे तर प्रत्येक २ महिलांमागे १ महिला ॲनॅमिक आहे. राज्यात वर्ष २०१६-१७ मध्ये १,२१७ मातांचा मृत्यू झाला आहे तर एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ या ७ महिन्यांच्या कालावधीत ७१९ माता मृत्यू झाले आहेत. कुपोषण कुटुंबातच असल्यामुळे जन्माला येणारे बाळ हे कुपोषित जन्माला येण्याचे प्रमाण मोठे आहे. महिला व बाल विकास मंत्री मान. पंकजा मुंडे यांनी दि. १४ डिसेंबर, २०१७ रोजी मान. विधानसभा सदस्यांच्या तारांकित प्रश्नाला दिलेल्या उत्तरात राज्यात एकात्मिक सेवा योजनेंतर्गत माहे मार्च २०१७च्या मासिक प्रगती अहवालानुसार ५,५०,६२५ बालके ही मध्यम कमी वजनाची आढळून आली आहेत तर ७८,४३२

बालके ही तीव्र कमी वजनाची आहेत. यावरून राज्यातील कुपोषणाचा प्रश्न किती गंभीर बनला आहे याचा अंदाज येतो.

- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व सहयोग कार्यक्रम म्हणजे मातृ वंदना योजना या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी १ जानेवारी, २०१७ पासून करावयाची होती.५३ जिल्ह्यामध्ये ही योजना पायलट प्रोजेक्ट म्हणून राबविली गेली. या योजनेअंतर्गत गरोदर महिलेला ३ टप्प्यांमध्ये रु. ५,०००/- चे अनुदान दिले जाते. सप्टेंबर, २०१७ मध्ये या योजनेबाबतची मार्गदर्शिका केंद्र शासनाने प्रकाशित केली आहे. त्यामुळे युद्ध पातळीवर या योजनेची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. भविष्यात बाल मृत्यू रोखायचे असतील तर सार्वजनिक आरोग्य, महिला व बाल विकास, आदिवासी विकास, अन्न व नागरी पुरवठा या विभागांना एकत्रितरित्या काम करावे लागेल व वित्त विभागाने या विभागांच्या योजनांना योग्यप्रकारे निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.

## आदिवासी विकास विभाग

### पूरक मागणी क्र.टी-०२

२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांकांचे कल्याण

**बाब क्र. १९९ आश्रमशाळा व मुलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान देण्याकरिता रु. २८ कोटी ४७ लाख २४ हजारांची अतिरिक्त तरतूद.**

- अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत स्वयंसेवी संघटनेद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदान प्राप्त आश्रमशाळांच्या परिरक्षणासाठी सदर अनुदान देण्यात आला आहे. राज्यात सद्यस्थितीत १ हजार १०९ आश्रमशाळा कार्यरत असून त्यात ५५२ शासकीय तर ५५७ अनुदानित आश्रमशाळांचा समावेश आहे. शासकीय आश्रमशाळेमध्ये (इयत्ता १ ली ते १२ वी) १ लाख ८७ हजार२१६ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुलींची संख्या ८४ हजार आहे.

(४५.१२%) तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये (इयत्ता १ ली ते १२ वी) २ लाख १० हजार ८७४ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुलींची संख्या ८२ हजार ७५० आहे. (३९.२४%)

- आज आदिवासी विकास विभागाच्या पदांचा विचार केला तर २० हजार ३०२ पदे मंजूर आहेत त्यापैकी १४ हजार ५९६ पदे भरलेली असून ५ हजार ७०६ पदे रिक्त आहेत. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्गखोल्या अपुऱ्या असणे, शिक्षक, मुख्याध्यापक, पुरुष अधिक्षिका व स्त्री अधिक्षिका, संगणक शिक्षक, पहारेकरी, स्वयंपाकी, कामाठी, शिपाई, सफाई कामगार यांची बहुतांश पदे आज रिक्त आहेत.
- आश्रमशाळेतील सेवा-सुविधांची वानवा असून 'हागिनदारी मुक्त' महाराष्ट्रात आमची आदिवासी मुलं-मुली मात्र शौचास उघड्यावर जात आहेत हे लांच्छनास्पद नाही का? २० मुलांमागे १ शौचालय असणे गरजेचे असताना ९० मुलांमागे १ शौचालय असल्याचे आश्रमशाळा पाहणीत दिसून आले आहे. अनेक ठिकाणी मुलां-मुलींना नदी, ओढा वा तलावावर उघड्यावर आंघोळीला जावे लागते.
- अनेक ठिकाणी आश्रमशाळेच्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. तर काही ठिकाणी आश्रमशाळा या पत्र्याच्या शेड मध्ये भरविल्या जात आहेत. आश्रमशाळा संहितेनुसार विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र निवासस्थाने असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी २४ ते ४० चौ. फूटाची खोली असणे आवश्यक आहे. मात्र अशाप्रकारची निवासाची व्यवस्था कुठल्याच आश्रमशाळेत आढळून येत नाही.
- आश्रमशाळेत भोजनाचा दर्जा राखणे गरजेचे आहे. मात्र कोणत्याच आश्रमशाळेत भोजनाचा दर्जा राखला जात नाही. आश्रमशाळेतील दोन भोजनामधील अंतरही विद्यार्थ्याच्या आरोग्यास अपायकारक ठरते. सकाळी नाश्ता झाला की, दुपारी १२ वाजता जेवण मिळते त्यानंतर सायंकाळी थेट ७ वाजता रात्रीचे जेवण मिळते. याचाच अर्थ दुपारचे जेवण झाल्यानंतर थेट ७ तासांनी रात्रीचे जेवण मिळते तर रात्री ७वा जेवण झाल्यानंतर १३ तासांनी सकाळी ८ वाजता सकाळचा नाश्ता मिळतो त्यामुळे आश्रमशाळेच्या सध्याच्या भोजन-नाश्त्याच्या वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांचे कुपोषणच होत आहे.

✍ मागील १५ वर्षात महाराष्ट्रातील आश्रमशाळेत १,०७७ विद्यार्थ्यांचे मृत्यू झाले असल्याचे शासनानेही मान्य केलेले आहे. आश्रमशाळा संहितेनुसार २० प्रकारचे आजार, व्यंग आरोग्याबाबत प्रत्येक विद्यार्थ्यांची तपासणी होणे गरजेचे आहे. ७००-८०० विद्यार्थ्यांची तपासणी ही केवळ वर्षातून एकदा व त्यातही ३-४ तासात आरोग्य तपासणी उरकली जाते. आश्रमशाळेत आरोग्य तपासणीतही तेवढेच अक्षम्य दुर्लक्ष दिसून येते. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या ओढविणाऱ्या मृत्यूला आरोग्य तपासणीमधील निष्काळजीपणाही तितकाच जबाबदार आहे. त्यामुळे आजच्या आश्रमशाळा त्या शासनाच्या असतील वा स्वयंसेवी संस्थांच्या असतील त्या विद्यार्थ्यांच्या अनारोग्याचे केंद्र बनले आहे.

दि. १९ डिसेंबर, २०१७

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### पूरक मागणी क्र. एच-७

### ५०५४, मार्ग व पूल

बाब क्र. ८३ राज्य महामार्गाचा खर्च भागविण्यासाठी ३३ कोटी १७ लाख रुपये तसेच बाब क्र. ८४ नुसार राज्यामध्ये शीघ्रतेने रस्त्यांचा विकास करण्यासाठी नाबार्डच्या कर्ज सहाय्य अंतर्गत ८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

✍ वर्षभराआधी बांधकाम मंत्री मान. चंद्रकांत पाटील यांनी दि.१५ डिसेंबर, २०१६ नंतर 'खड्डे दाखवा व १ हजार रुपये बक्षीस मिळवा' अशी घोषणा केली होती. मात्र ही योजना फसल्यानंतर मान. मंत्र्यांनी दि.१५ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदत वाढविली होती. राज्यात बांधकाम विभागाकडे ८६,००० कि.मी. लांबीचे रस्ते असून त्यापैकी १६ हजार कि.मी. लांबीचे रस्ते राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.

✍ रस्त्याच्या दुरुस्तीसाठी दरवर्षी १ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात असते. मात्र रस्त्यांचा अयोग्य भराव, डांबरीकरणाचा निकृष्ट दर्जा, डांबरीकरण थराची कमी जाडी, मोठ्या व अवजड

वाहनामुळे रस्त्यांवर अतिरिक्त भार यामुळे रस्ते मुदतीच्या आत लवकर खराब होत असल्याचे दिसून येते. याबाबत बांधकाम मंत्र्यांनी विविध जिल्ह्यांमध्ये बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या त्यांच्यासोबत बसून कृती आराखडा तयार केला. यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा असेही आदेश दिले आहेत मात्र असे असूनही अनेक ठिकाणी रस्त्याची कामे अपूर्ण आहेत.

- ज्या ठिकाणी मुरुम टाकला गेला तिथले खड्डेही बुजलेले नाहीत. तर अनेक ठिकाणी खड्ड्यात डांबरच टाकले गेलेले नाही. यासाठी दि. १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत खड्डे बुजविण्याबाबत दिलेली मुदत देखील संपलेली आहे. त्यामुळे बांधकाम मंत्र्यांनी दिलेले खड्डेमुक्त रस्त्याचे आश्वासन हे इतर अनेक आश्वासनाप्रमाणे आश्वासनचं बनून राहिल्याचे दिसून येते. त्यामुळे बांधकाम अभियंते, अधिकारी व कंत्राटदार यांच्यातील साटेलोटे असल्यामुळे तर हे खड्डे बुजले जात नाही ना हे पाहावे लागेल. जर यामध्ये भ्रष्टाचार होत असेल तर त्याबाबत बांधकाम मंत्र्यांना कडक भूमिका घ्यावी लागेल.

## महिला व बाल विकास विभाग

### पूरक मागणी क्र.एक्स-१

### २२३६, पोषण आहार

बाब क्र. २३७ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेसाठी आहार खर्चासाठी ४०० कोटी ७२ लाख रुपयाची अतिरक्त तरतूद तसेच बाब क्र. २३८ नुसार ग्राम बाल विकास केंद्रासाठी २१ कोटी १९ लाख ६४ हजार रुपयांची तरतूद करणे. आहार खर्चाची प्रलंबित देयके देण्यासाठी केलेली तरतूद अपुरी असल्याचे आढळून आले आहे.

- राज्यातील ग्रामीण आदिवासी व झोपडपट्टीतील सहा वर्षाच्या बालकांची योग्य शारीरिक वाढ व विकास साधण्याच्या उद्देशाने एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प राबविला जातो. या योजनेत शालेय पूर्व बालके, गर्भवती महिला व स्तनदा मातांना निरोगी ठेवण्यासाठी पूरक पोषण आहार, लसीकरण व आरोग्य तपासणी व शिक्षण अशा मूलभूत सुविधा पुरविल्या जातात. कुपोषणावर आळा घालून माता व बालमृत्यूची संख्या कमी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी त्यांना सुका आणि ओला असा पौष्टीक आहार दिला जातो. प्रत्येक मुलामागे आहार आहार पुरविणाऱ्या संस्थेला ४ रुपये ९२ पैसे दिले जातात. या तुटपुंज्या रकमेमध्ये सकस आहार कसा देणार आणि बालके कुपोषणापासून कशी वाचणार हा गंभीर विषय पुढे आला आहे. अंगणवाडी सेविका आणि महिला बचतगट यांच्या माध्यमातून शिजविलेला पोषण आहार बालकांना दिला जातो.
- वर्ष २०१५-१६ मध्ये राज्यामध्ये १७ हजार बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाला होता त्याबाबत उच्च न्यायालयाने राज्य शासनाला फटकारले होते. राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आरोग्यविषयक अहवालात १) वर्ष २०१६-१७ मध्ये शासनाच्या धोरणात विशेष सुधारणा झालेल्या नाहीत या कालावधीत राज्यात १४ हजार ३६८ बालकांचा बळी गेलेला आहे. तर एप्रिल ते ऑक्टोबर २०१७ या ७ महिन्याच्या कालावधीत ८ हजार ५३२ बालकांनी आपले प्राण सोडले आहेत. २) एवढेच नाही तर वर्ष २०१६-१७ मध्ये १७ हजार १९७ अर्भकांचा मृत्यू झाला आहे. तर एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत ९ हजार ६९८ बालकांचा मृत्यू झाला आहे. ३) वर्ष २०१६-१७ मध्ये १ हजार २१७ मातांचा मृत्यू झाला असून एप्रिल ते ऑक्टोबर या ७ महिन्याच्या कालावधीत ७१९ मातांनी आपले प्राण सोडले आहेत.
- पालघर सारख्या आदिवासीबहुल जिल्ह्याची स्थिती दयनीय असून गेल्या जानेवारी ते ऑगस्ट, २०१७ या ८ महिन्याच्या कालावधीत ३१३ बालकांचा मृत्यू झाला आहे. महिला व बाल विकास मंत्री मान. पंकजा

मुंडे, सार्वजनिक आरोग्य मंत्री मान. दीपक सावंत यांनी वेळोवेळी या जिल्ह्याला भेट देऊनही शासनाच्या धोरणात कोणताही सकारात्मक बदल झालेला नाही.

- विदर्भातील मेळघाटमध्ये वर्ष १९९३ पासून आतापर्यंत म्हणजे सप्टेंबर २०१७ पर्यंत १४ हजार १५ बालकांनी आपले प्राण गमावले आहेत. ताज्या आकडेवारीनुसार वर्ष २०१७ मध्ये ४०७ बाल मृत्यू झालेले आहेत, ६३ उपजत मृत्यू झाले असून ३ माता मृत्यू झालेले आहेत. भविष्यात बाल मृत्यू, अर्भक मृत्यू व माता मृत्यू थांबवायचे असतील तर सार्वजनिक आरोग्य, महिला व बाल विकास, आदिवासी विकास, अन्न व नागरी पुरवठा, शालेय शिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार तसेच नियोजन विभाग यांना परस्पर पूरक काम करावे लागेल.